**नियमीत दिवाणी दावा क्र.३३७/२०२५**
**CNRNOMHOS120004782025**
**सखाराम वि. सुखदेव व इतर**
**नि.क्र. ४५ खालील आदेश**
**(आदेश दि.०४/०८/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.३ याच्या विरुध्द झालेला दावा अवसानीचा आदेश रद्द होण्यासाठी दिलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.३ नामे विलास पाराजी गवळी हे दिनांक १०.११.२०२४ रोजी मयत झाले आहेत. मयत वादीचे वारसदार दाव्यामध्ये नमूद नाहीत. अर्जदार यांना मयताचे वारसाची नांवे, वय व पत्ता माहित नव्हते. त्यामुळे वादीला मयताचे वारस अभिलेखावर घेण्यास उशीर झाला. परिणामस्वरुपी दावा प्रतिवादी क्र. ३ विरुध्द अवसानीत निघालेला आहे. शेवटी त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. मयत प्रतिवादी क्र. ३ च्या प्रस्तावित वारसांनी प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले आहे की, अर्ज संयुक्तीक नाही. प्रतिवादीने प्रतिवादी क्र. ३ हा मयत झाल्याबाबत अभिलेखावर दिनांक २२.०१.२०२६ रोजी पुरसीस दिली होती त्यानंतर ब-याच कालावधीनंतर वादीने प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत अर्ज जास्तीत जास्त खर्चावर नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. उभयपक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

६. निशाणी क्र. ४१ वर दाखल मृत्यू प्रमाणपत्रांवरुन प्रतिवादी क्र. ३ विलास पाराजी गवळी हे दिनांक १०.११.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. तदनंतर ९० दिवसांच्या आत मयताचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक

होते. तदनंतर दावा अवसानीचा आदेश रद्य करुन घेण्यासाठी वादीने ६० दिवसांच्या आत तसा अर्ज सादर करणे आवश्यक होते. प्रतिवादी क्र. ३ च्या विधिज्ञांनी प्रतिवादी क्र.३ चा मृत्यू झाल्याची बाब दिनांक २२.०१.२०२६ च्या पुरसीसद्वारे कळविली आहे. पक्षकाराच्या मृत्यूची माहिती लगेच देणे हे संबंधीत विधिज्ञांचे कर्तव्य आहे. प्रतिवादी क्र. ३ च्या मृत्यूची माहिती देण्यास त्याच्या विधिज्ञांमार्फत उशीर झाल्याचे दिसून येते. तरी दिनांक २२.०१.२०२६ च्या पुरसीस नंतर तरी वादीने प्रतिवादी क्र. ३ चे वारस योग्य मुदतीत अभिलेखावर आणने गरजेचे होते. परंतु वादीतर्फे प्रतिवादी क्र. ३ विरुध्द झालेला दावा अवसानीचा आदेश रद्य होऊन मिळण्यासाठी सादर केलेले कारण रास्त व संयुक्तीक वाटते. त्यामुळे अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. नि. क्र. ४५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत वादीने सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.08.04 18:11:00 +0530

दिनांक – ०४/०८/२०२६

(राहुल द. डांगे),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

नि दि.वा.क्र.३३७/२०२५
नि.क्र. ४३ खालील आदेश

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division,<br>Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 04/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 04/08/2026 |
| Order uploaded on | --- | 04/08/2026 |